सहाय्यक विद्युत निरीक्षक, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची विनंतीनुसार बदली.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन आदेश क्र. बदली-२०१९/प्र.क्र.११८/ऊर्जा-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार व विद्युत निरीक्षणालय शाखेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्यांचे अधिकार अधिसूचित केल्यानुसार, सक्षम प्राधिकाऱ्याच्या व त्यांच्या लगतनंतरच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, श्रीमती. राजश्री गिते, सहाय्यक विद्युत निरीक्षक, चाळीसगाव, निरीक्षण विभाग, जळगाव यांची त्यांनी केलेली विनंती विचारात घेऊन सहाय्यक विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, नाशिक येथील रिक्त पदावर बदली करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्याला त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी त्वरीत कार्यभार घेता यावा म्हणून नजीकच्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडे कार्यभार देण्याची व्यवस्था करून सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमूक्त करण्यात यावे. श्रीमती. गिते यांनी नवीन नेमणूकीच्या जागी ताबडतोब रुजू व्हावे व तसा अहवाल सादर करावा. तसेच बदली झालेल्या अधिकाऱ्यास रजा मंजूर करू नये.

३. तसेच या आदेशान्वये करण्यात आलेली बदली रद्द करणे किंवा त्यात बदल करणे यासाठी राजकीय दडपण /दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्युत निरीक्षक यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात येईल.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१७१८३०१२१६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundlik Badgeri

Digitally signed by Prashant Pundlik Badgeri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=07ae22a8e7fa4047ce6ff816d85e77eec14db9926b325a140acf9b28bb990786,
serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundlik Badgeri
Date: 2019.09.17 18:41:51 +05'30'

(प्रशांत पुं. बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पू.) मुंबई-७१.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखाधिकारी, मुंबई
४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
५. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर
६. श्रीमती. राजश्री गिते, सहाय्यक विद्युत निरीक्षक यांना
७. द्वारा: अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
५. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
६. उपसचिव (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. निवडनस्ती (ऊर्जा-५).